ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ३ रु.

टेलि. ५५६२०

दुर्गानिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Regt. No. B. 3434, Licence No. 53.

वर्ष ३१ पुणें, बुधवार १६ जून, १९६५ अंक १२

## विविध माहिती

**फांशीची शिक्षा रद्द करण्याचा कायदा**—खुनाबद्दल फांशीची शिक्षा देणारा कायदा रद्द करणाऱ्या बिलाचें पहिलें वाचन ब्रिटनच्या कॉमन्स सभेनें मंजूर केलें आहे. परंतु हा प्रयोग फक्त ५ वर्षांपुरताच मर्यादित करण्यांत आला आहे. हें बिल खाजगी असून त्याचीं आणखी दोन वाचनें व्हावयाचीं आहेत. बिलाला कायद्याचें स्वरूप येण्यापूर्वी त्याला हाउस ऑफ लॉर्ड्सच्या संभेच्या मंजुरीचीहि आवश्यकता आहे.

**केरळ राज्यांत शिक्षकांची टंचाई**—केरळ राज्यांत प्रशिक्षित शिक्षकांची टंचाई भासत असल्यानें सरकारी अनुदानें घेणाऱ्या शाळांतून सेवानिवृत्त शिक्षकांना पुन्हा कामावर घेण्याची सवलत देण्यांत आली आहे. मात्र ज्या सेवानिवृत्त शिक्षकांचें वय ५९ पेक्षा अधिक नसेल त्यांनाच पुन्हा नेमतां येईल. प्रशिक्षित शिक्षक मिळत नसले तरच सेवानिवृत्तांना नेमतां येईल.

**बद्रीनाथच्या यात्रेकरूंची कुचंबणा**—जम्नोत्री, गंगोत्री, बद्रीनाथ व केदारनाथ ह्या पवित्र स्थानांच्या यात्रेला जाणाऱ्या यात्रेकरूंची संख्या चालू हंगामांत खूपच वाढली आहे. त्यामुळें उतारूंची वाहतूक करणाऱ्या स्थानिक धंदेवाइकांवर अतिशय ताण पडत आहे. हृषीकेश येथें ३ हजार यात्रेकरू वाहतुकीच्या सोयींअभावीं अडकून पडले आहेत. तेथील सर्व धर्मशाळा भरून गेल्या आहेत. ही परिस्थिति १५ दिवस तरी टिकेल असा अंदाज आहे.

**केरोसिनच्या आयातींत कपात**—चालू वर्षाच्या अखेरीपर्यंत हिंदमध्यें आयात करण्यांत येणाऱ्या केरोसिनमध्यें बरीच कपात करण्यांत येणार आहे. ह्या सुमारास बरौनी आणि कोयाली येथील तेलशुद्धीच्या कारखान्यांतून रॉकेलच्या तेलाची पैदास होऊं लागेल. त्यानंतर लवकरच कोचीन येथील तेलशुद्धीचा कारखाना चालू होईल आणि मग देशांतील केरोसिनचें उत्पादन आणखीच वाढेल. सध्यां देशाच्या गरजेपैकीं ३० टक्के तेल परदेशांतून आयात करण्यांत येतें. रॉकेल व डिझेल तेलाचा कांहीं भागांत पडलेला तुटवडा दूर करण्यांत येत आहे.

**नव्या प्रकारचा कुकर**—संरक्षणविषयक संशोधन करणाऱ्या हिंदी शास्त्रज्ञांनी २५ ते ४० माणसांचें अन्न २॥ तासांत शिजवूं शकणारा नवीन प्रकारचा कुकर शोधून काढला आहे. ह्या कुकरचें वजन आंतील भांड्यासह ४२ किलोग्रॅम आहे. ह्या कुकरमुळें अन्न शिजण्याच्या वेळांत तर बचत होतेच; पण तो वापरण्यांत अडचणीहि फारशा नाहींत. कोठलेंहि द्रव जळण त्याला चालतें.

**कलकत्त्याला लिंबांचा पुरवठा**—कलकत्त्याच्या उन्हाळ्याला तोंड देण्यासाठी तेथील नागरिक कागदी लिंबांचा फार मोठ्या प्रमाणावर उपयोग करतात. हीं लिंबें मुख्यतः आंध्र व तामीळनाडमधून पाठविण्यांत येतात. मद्रास–हौरा एक्सप्रेसनें पाठविण्यांत येणाऱ्या लिंबांच्या पार्सलानें कधीं कधीं हौरा येथील फलाट भरून गेल्याचें दृश्य दिसतें. बंगालमध्यें होणाऱ्या लिंबांपेक्षा दक्षिण भारतामधील लिंबें अधिक रसाळ असतात.

**पोलाद कारखान्याच्या बांधणीचे आराखडे**—बोकारो येथें रशिआच्या मदतीनें बांधण्यांत यावयाच्या पोलादाच्या कारखान्यांतील झोतभट्टींचे आराखडे युक्रेनमधील रशिअन तंत्रज्ञांनीं तयार केले आहेत. कारखान्याच्या झोतभट्टी विभागांत ५ झोतभट्ट्या उभारण्यांत येणार आहेत. त्यांतील प्रत्येक झोतभट्टीची उत्पादनक्षमता भिलई येथील झोतभट्टीच्या उत्पादनक्षमतेपेक्षा दुप्पट आहे.

**न्यूयॉर्कला पाण्याची टंचाई**—न्यूयॉर्क शहरांत पाण्याची टंचाई भासूं लागल्यानें शहरांतील रेस्टॉरांमध्यें पाणी देण्यावर निर्बंध घालण्यांत आले आहेत. गिऱ्हाइकांनीं मुद्दाम मागणी केल्याशिवाय त्यांना पाणी न देण्याच्या सूचना नोकरांना देण्यांत आल्या आहेत. पर्जन्यमान कमी झाल्यामुळें शहराला पाण्याचा पुरवठा करणाऱ्या तळ्यांत गेल्या वर्षापेक्षा ३३ टक्के पाणी कमी आहे.

**पाकिस्तानला कॅनडाची मदत**—अणुशक्तीच्या साहाय्यानें वीज उत्पन्न करणारें केंद्र उभारण्यासाठी पाकिस्तान सरकारनें कॅनडाच्या जनरल इलेक्ट्रिक कंपनीशीं करार केला आहे. केंद्राच्या उभारणीसाठी ३२ कोटी रुपये खर्च येईल. त्यापैकीं ३५ ते ७० टक्के खर्च परदेशीय चलनांत करावा लागेल. केंद्रांत १ लाख, ३७ हजार किलोवॅट वीज निर्माण करता येईल. केंद्र कराचींत उभारण्यांत यावयाचें आहे.

**उपग्रहांचा लष्करी उपयोग**—पृथ्वीभोंवतीं अंतरिक्षांतून भ्रमण करणारे उपग्रह फिरविण्याच्या कामांत रशिआ आघाडीवर आहे. ह्या उपग्रहांचा उपयोग शांततामय कामासाठीच करण्यांत येत आहे असें सांगण्यांत येतें. परंतु बल्गेरिआला भेट देण्यासाठी गेलेल्या एका रशियन अंतरिक्षवीरानें हा बुडबुडा फोडला आहे. एका सार्वजनिक सभेंत बोलतांना तो म्हणाला, कीं जरूर पडली तर ह्याच अंतरिक्षयानांतून आक्रमकांवर प्रहार करणारीं अशीं अस्त्रें रशिआ पाठवूं शकेल. ह्यापूर्वी रशियाचे माजी पंतप्रधान मि. क्रुश्चॉव्ह ह्यांनीं असाच इशारा एकदा दिला होता.

# प्रगतीचीं दोन चक्रें...




## शेती व उद्योगधंदे

उद्योगधंद्याचीं चक्रें अव्याहत फिरतीं ठेवण्यासाठीं पाण्याचा सतत पुरवठा पाहिजे असतो, रसायनें आणि द्रवपदार्थ इकडून तिकडे न्यावे लागतात, मलिन पदार्थांचा निंचरा करावा लागतो. हीं कामें पंपांच्या सहाय्यानें होतात. कारखान्यांत आणि शेतीसाठीं पदोपदीं पंपांची गरज असते. ही गरज **किर्लोस्कर पंप** उत्तम प्रकारें भागवीत आहेत.

**किर्लोस्कर**

पंपनिर्मितींत अग्रेसर



**किर्लोस्कर ब्रदर्स लि.** किर्लोस्करवाडी – जिल्हा सांगली.

# वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१९००

**बचतीच्या आकर्षक योजना**

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | „ ३। „ |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | „ ५ „ |

*मुदतीच्या आकर्षक दरासंबंधी चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

# अर्थ

बुधवार, १६ जून, १९६५





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## चौथा पंचवार्षिक कार्यक्रम मोठा असणें जरूर

नियोजन समितीचे सभासद डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव ह्यांनीं मद्रास येथें पत्रकारांशीं बोलतांना चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाविषयीं आपले विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले कीं, लोकांच्या आकांक्षा पूर्ण करावयाच्या असतील तर चौथा पंचवार्षिक कार्यक्रम मोठा असणें आवश्यक आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेंत सध्यां चलनवृद्धि झालेली आहे. चौथ्या कार्यक्रमांत चलनवृद्धीची वाढ होणार नाहीं याविषयीं दक्षता घेण्यांत येणार आहे. चौथा पंचवार्षिक कार्यक्रम कांहींसा लहान करण्यांत आला तरीसुद्धां चलनवृद्धीचा ताण कमी होईल असें नाहीं. खरा प्रश्न कार्यक्रम अंमलांत आणण्यासाठी लागणारीं साधनें कशा रीतीनें मिळविण्यांत येतात आणि त्यांचा उपयोग कसा करण्यांत, येतो हा आहे. कार्यक्रमांत अग्रस्थान कोणत्या उद्दिष्टांना देण्यांत येतें आणि तो किती कार्यक्षमतेनें अंमलांत आणण्यांत येतो ह्यावर चलनवृद्धीचा ताण अवलंबून आहे; कार्यक्रमाच्या लहानमोठेपणावर नाहीं. हिंदच्या अर्थव्यवस्थेंत स्वयंसिद्धतेचा गुण निर्माण करणें आवश्यक आहे. स्वतःची गति स्वतःच उत्पन्न करण्याची शक्ति अर्थव्यवस्थेंत आली पाहिजे. दुसऱ्या शब्दांत असें सांगतां येईल कीं, देशांतील बचतीची व भांडवलगुंतवणुकीची गति दीर्घ कालपर्यंत ६ ते ७ टक्के वाढ शक्य करणारी असली पाहिजे. तीन पंचवार्षिक कार्यक्रम पार पडूनहि चलनवृद्धि होऊन किंमती वाढल्या आहेत, ही गोष्ट खरी आहे. परंतु गेल्या १५ वर्षांत किंमती सारख्या वाढतच होत्या असें म्हणतां येणार नाहीं. गेल्या दोन वर्षांत मात्र किंमती वाढल्या आहेत. पण गेल्या पंधरा वर्षांच्या अवधींत उत्पादनांत मोठी वाढ झालेली आहे इकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. अलीकडे वाढलेल्या किंमतींना दोन कारणें आहेत. एक तर संरक्षणासाठी तांतडीचा कार्यक्रम आखावा लागला; आणि तो विकासाचीं कामें चालू ठेवून पार पाडावा लागत आहे.

## शेतीसाठी पुरेसे ट्रॅक्टर्स नाहींत

भारतामधील अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्यासाठी शेतीच्या आधुनिक पद्धतींचा अवलंब करण्यांत आला पाहिजे ही गोष्ट आतां सर्वमान्य झालेली आहे. आधुनिक पद्धतीची शेती करण्यास ट्रॅक्टर्सची गरज ही ओघानेंच आली पण भारतांत ट्रॅक्टर्सची पुरेशी संख्या नाहीं. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत भारताला १५ लाख ट्रॅक्टर्स लागतील असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या गरजेशीं तुलना करतां देशांतील ४० हजार ट्रॅक्टर्सची सध्यांची संख्या अत्यल्पच म्हणावी लागेल. ट्रॅक्टर्स तयार करण्याची देशांतील क्षमताहि बेताचीच आहे. गेल्या सालीं सुमारें ३ हजार ट्रॅक्टर्स जेमतेम तयार करण्यांत आले. मध्यवर्ती सरकारनें ट्रॅक्टर्सची उणीव दूर करण्याच्या दृष्टीनें कांहीं पावलें टाकण्यास प्रारंभ केला आहे. सार्वजनिक मालकीच्या विभागांत मध्यम ट्रॅक्टर्स तयार करण्याचे कारखाने काढण्याचा विचार सरकारतर्फे चालू आहे. सध्यां असलेल्या ४० हजार ट्रॅक्टर्सपैकी दोन तृतीयांशापेक्षाहि अधिक ट्रॅक्टर्स परदेशांतून आयात केलेले आहेत. परंतु त्यांना लागणारे सुटे भाग आयात करावे लागतात अगर ते देशांतच बनविण्याची सोय करावी लागते. हे दोन्ही मार्ग अवलंबण्यास सध्यां अनुकूल परिस्थिति नाहीं. त्यामुळें सुमारें २० हजार ट्रॅक्टर्स ह्या वर्षाच्या आरंभीं निरुपयोगी स्थितींत पडून राहिलेले होते. ह्यावरून नवीन ट्रॅक्टर्स करण्याइतकेंच महत्त्व जुनें वापरांत ठेवण्यास आहे हें दिसून येतें. ह्या बाबतींतल्या सरकारी धोरणाप्रमाणें येत्या कांहीं वर्षांत ट्रॅक्टर्स तयार करणारे ७ कारखाने स्थापन करण्यांत येणार आहेत. ह्या सर्व कारखान्यांत मिळून दरसाल २० हजार ट्रॅक्टर्स तयार करण्यांत येतील. पण ह्या कामीं सावधानतेची जरूर आहे. तयार होणाऱ्या ट्रॅक्टर्सचे नमुने आणि आकार प्रमाणित राखण्याची जबाबदारी घेणें जरूर आहे. एरव्हीं त्यांचे अनेक प्रकार आणि त्यांना लागणाऱ्या सुट्या भागाचेहि अनेकविध प्रकार होऊन गोंधळ उत्पन्न होण्याचा संभव आहे. तो लक्षांत घेण्याची दक्षता बाळगण्यांत आली पाहिजे.

## नियोजित अर्थव्यवस्थेंतील साधनांची जमवाजमव

स्टेट बँक ऑफ इंडिआचे अध्यक्ष श्री. देहजिया ह्यांचें मुंबई येथें 'नियोजित अर्थव्यवस्थेंतील साधनांची जमवाजमव' ह्या विषयावर भाषण झालें. ते म्हणाले कीं चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी लागणारी साधनसामग्री जमविण्याविषयीं सध्यां चर्चा चालू आहे. ही जमवाजमव करतांना लोकांवर तिचा काय परिणाम होईल ह्यासंबंधीं विचार करण्यांत आला पाहिजे. आतांपर्यंत मध्यवर्ती सरकारनें व राज्य सरकारांनीं जी करव्यवस्था उभारली आहे ती एकाच वस्तूच्या गटावर आधारलेली आहे, इतकेंच नव्हे तर त्याच त्याच लोकांच्यावरहि करांची आकारणी करण्यांत आलेली आहे हेंहि कांहीं अंशीं खरें आहे. अर्थात, करांची व्यवस्था उभारतांना सरकार सनदशीर हक्कांच्या मर्यादेंतच आहे. परंतु, चौथ्या कार्यक्रमासाठी साधनें जमवितांना ह्या मुद्याचा विचार करण्यांत आला पाहिजे. सध्यां भारताचा परदेशीय चलनाचा साठा बराच खालावला आहे; किंमती वाढत आहेत, आणि म्हणून नियंत्रणें व निर्बंध घालावे लागत आहेत. तथापि नियोजित अर्थव्यवस्थेंत नियंत्रणें हीं येणारच. पहिल्या तीन पंचवार्षिक कार्यक्रमांचा अनुभव असा आहे कीं, त्यांत होणाऱ्या खर्चाच्या अंदाजापेक्षा झालेला खर्च कितीतरी अधिक होता. एकाच वेळीं अनेक कामें हातीं घेण्यांत येत असल्यामुळें त्यांची अंमलबजावणी करतांना खर्च वाढला. जीं कामें करावयाचीं आहेत तीं करण्यासाठी लागणाऱ्या भौतिक वस्तू काय प्रमाणांत मिळू शकतील ह्याचा अंदाज करून गरजा व वस्तू मिळण्याची शक्यता ह्यांचा मेळ घालण्यांत आला पाहिजे. असें करण्यानें प्रत्यक्ष काम पदरांत पडण्यास मदत होईल. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासंबंधीं बोलावयाचें तर असें म्हणतां येईल कीं, ह्या कार्यक्रमांत संरक्षणविषयक गरजा आणि विकासाच्या कामाच्या गरजा ह्यांच्यावर :सारखाच भर देण्यांत आला. परिणाम असा झाला कीं, उपलब्ध साधनसामग्रीवर अतिशय ताण पडून अर्थव्यवस्था अडचणींत आली.

## विद्युत्‌लहरींनीं वर्तणुकीवर नियंत्रण

विद्युत्‌लहरींचा वापर करून माणसांच्या आणि जनावरांच्या वर्तणुकीवर नियंत्रण ठेवण्याची शक्यता अमेरिकेंतील एका वैद्यकीय शास्त्रज्ञानें दृष्टिपथांत आणली आहे. ह्या शास्त्रज्ञाचें नांव डॉ. डेल्गडो असून ते येल विद्यापीठाच्या वैद्यकीय शाखेंत काम करतात. आपल्या विलक्षण शोधाची चांचणी घेण्यासाठी डॉक्टर स्पेनमध्यें गेले आणि बैलांच्या झुंजीच्या रंगणांत उतरले. ह्या विशिष्ट प्रकारच्या झुंजींत बैलाशीं सामना करणारा माणूस एक तांबडें फडकें आणि तलवार जवळ बाळगतो. पण डॉक्टरांनीं तलवारीऐवजीं एक लहानसा ट्रॅन्झिस्टर रेडिओप्रक्षेपक जवळ घेतला होता. झुंजीची वेळ झाल्यावर माजलेल्या बैलानें पूर्ण अवसानासह डॉक्टरांच्यावर चाल केली, आणि काय चमत्कार! त्यांनीं ट्रॅन्झिस्टरमधील एक कळ दाबल्याबरोबर चारी खुरांवर उधळत येणारा बैल धुळीच्या ढगांत एकाएकीं थबकला. मग डॉक्टरांनीं आणखी एक कळ दाबतांच तो शांतपणें परत फिरला व निघून गेला. डॉक्टरांनीं आदल्या दिवशीं त्या बैलाच्या मेंदूंत विद्युत्‌लहरी स्वीकारणाऱ्या कांहीं विजेच्या अतिसूक्ष्म तारा बसविल्या होत्या. ट्रॅन्झिस्टरमधील कळा दाबतांच त्यांतून प्रक्षेपित होणाऱ्या विद्युत्‌लहरींचा बैलाच्या मेंदूंतील तारांवर आघात झाला आणि क्रोधाचा मूर्तिमंत अवतार असा तो बैल शांतिस्वरूप पावला. अशा प्रकारच्या सूक्ष्म तारा माणसांच्या मेंदूंत बसवून त्यांची हवी तशी वर्तणूक घडविणें शक्य आहे असें डॉ. डेल्गडो ह्यांचें मत आहे. अशा तारा बसविण्यांत माणसाला कांहींहि धोका पोंचत नाहीं. माणसाप्रमाणेंच माकडें आणि मांजरें ह्यांच्यावर हा प्रयोग करण्यांत आलेला असून तो यशस्वी झालेला आहे. आतापर्यंतचे शास्त्रीय शोध चतुर राजकारण्यांनीं वापरलेले आहेत. तसेंच ह्या शोधाचें झालें तर ती एक आपत्तीच होईल.

## काळा पैसा 'पांढरा' करण्याची संधि संपली

गेल्या कांहीं वर्षांत भारतामधील सर्वच वस्तूंच्या किमती झपाट्यानें वाढत गेल्या. नित्योपयोगी वस्तूंच्या किमतींनीं तर आजपर्यंतचा उच्चांकच गांठला. किमती वाढत जाण्याच्या प्रवृत्तीच्या अनेक कारणांपैकीं दडवलेल्या पैशाचा बाजारवर होणारा परिणाम हें एक महत्त्वाचें कारण मानण्यांत येत होतें. हा दडवलेला म्हणजे मुख्यतः कर चुकवून सांठवलेला पैसा. तो मिळविणाऱ्यानें खुल्या दिलानें कबूल केला तर त्यापैकीं ६० टक्के कर म्हणून भरून बाकीचा ४० टक्के, काळ्या पैशाच्या छापांतून मुक्त करण्यांत येईल अशी सवलत भारताच्या अर्थमंत्र्यांनीं दिली होती. मात्र मार्च ते मे अखेरच्या तीन महिन्यांत जे ह्या सवलतीचा फायदा घेतील त्यांनाच तो मिळणार होता. ह्या तीन महिन्यांच्या अवधींत सर्व भारतांत मिळून सुमारें ५२ कोटी रुपये काळा पैसा उजेडांत आला. सवलतीचा फायदा घेणारे १,९७९ लोक निघाले. ह्या अवधींत जीं दडविलेलीं उत्पन्नें कबूल करण्यांत आलीं, त्यावरील प्राप्तिकराची रक्कमच २०·३२ कोटी रुपये झाली. ती सर्व रोखीनें भरण्यांतहि आली. मुंबईंत १८·९३ कोटी रुपयांचें दडविलेलें उत्पन्न कबूल करण्यांत आलें. ८०० लोकांनीं ह्या संधीचा फायदा घेतला. कोणा एका व्यक्तीनें ३० लाखांच्या उत्पन्नाची कबुली दिली. अलीकडे स्टेट बँकेच्या गव्हर्नरांनीं व्यापारी उलाढाली रोखीनें करण्याची प्रवृत्ति वाढली असल्याचा उल्लेख केला होता. दडवलेल्या व म्हणून हिशेबांत न दाखविलेल्या पैशाचा उपयोग मुख्यतः रोखीच्या उलाढालींत करण्यांत येत असतो. त्यामुळें व्यवहार होऊनसुद्धां त्यामधील पैशाच्या देवाणघेवाणीचा पुरावा राहात नाहीं. काळ्या पैशाचा उपयोग करून जीवनावश्यक वस्तूंची कोंडी करण्याचा खेळ व्यापारीवर्ग करतो अशा तक्रारी करण्यांत येतात. उजेडांत आलेला काळा पैसा व्यवहारांतून बऱ्याच प्रमाणांत बाद झाल्यामुळें किमतीवर काय परिणाम होतो तें अद्याप दिसावयाचें आहे.

---

## खनिज संपत्तीच्या पाहणीचा कार्यक्रम

चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत हिंदमधील खनिज संपत्तीचें संशोधन करण्याची एक मोठी मोहीम हातीं घेण्यांत येणार आहे. खनिज संपत्तीच्या सांठ्याची पाहणी करून शोध लावण्याची कामगिरी ह्या मोहिमेंत करण्यांत येणार आहे. अमेरिका, कॅनडा आणि रशिआ ह्या प्रगत देशांचें साह्य भारताला मिळणार आहे. पाहणी करावयाच्या भू-विभागांत राजस्थानमधील अरवली पर्वताचा टापू, आंध्र प्रदेशामधील कडापा जिल्ह्याच्या पूर्वेकडील भाग, बिहारमधील रांचीचें पठार, इत्यादींचा समावेश आहे. तांबें, निकेल, शिसें आणि जस्त ह्या खनिजांचा शोध प्रामुख्यानें करण्यांत येणार आहे. भू-गर्भांतील संपत्तीची विमानांच्या साह्यानें पाहणी करण्याची एक पद्धत आहे. ह्या पद्धतीचा उपयोग करण्याची तयारी करण्यांत येत आहे. हें काम करण्यासाठी अमेरिकेकडून साह्य घेण्यांत आलें आहे. पावसाळा संपल्यावर वैमानिक पाहणी सुरू करण्यांत येईल. पाहणीच्या कार्यक्रमासाठी सुमारें २ कोटी रुपये खर्च येणार असून त्यापैकीं ३५ लाख रुपयांचा खर्च परदेशीय चलनांत करावा लागेल. जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया आणि इंडिअन ब्यूरो ऑफ माइन्स ह्या संघटना कॅनडाशीं एक करार करणार आहेत. पाहणीच्या कामीं लागणारें आधुनिक यंत्रसाहित्य कॅनडा पुरविणार आहे. करारांतील अटींना अनुसरून कॅनडा भारताला विविध प्रकारचीं कामें करणारीं ४·७७ कोटी रुपये किमतीचीं यांत्रिक उपकरणें देणार आहे. रशिआकडून, अंतरिक्षांतून करण्यांत येणाऱ्या चुंबकीय पाहणीचीं उपकरणें मिळणार आहेत. परंतु, ह्याबाबतचा तपशील अद्याप ठरविण्यांत आलेला नाहीं. हिंदमधील खनिज संपत्तीचा शोध करणाऱ्या वरील दोन्ही संघटनांचा विस्तार करण्यांत येणार आहे. पुढच्या कार्यक्रमांत ह्या संघटनांवर ५० कोटी रुपये खर्च करण्यांत येणार आहेत.

---

## डबाबंद फळांचा सहकारी कारखाना

मद्रास राज्यांत वेलोर ह्या ठिकाणीं डबाबंद फळांचा एक कारखाना सहकारी तत्त्वावर काढण्यांत येणार आहे. कारखान्याची उभारणी करण्याचें काम युगोस्लाव्हिआच्या तंत्रज्ञांच्या मदतीनें करण्यांत येणार आहे. प्रथम ह्या कारखान्यांत आंब्याचा रस अगर मोरंबा आणि टोमॅटोचा रस डबाबंद करण्यांत येईल. मद्रास राज्यांतील अशा प्रकारचा तो सर्वांत मोठा कारखाना होईल. कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामग्री आयात करण्याचा परवाना मिळविण्यांत आला आहे. यंत्रसामग्री युगोस्लाव्हिआंतून आयात करण्यांत येईल. ह्या कामासाठी सरकारकडे ५ लाख रुपयांच्या मदतीची मागणी करण्यांत आली आहे. कारखान्यांत बसविण्यांत येणारी यंत्रसामग्री स्वयंचलित असेल आणि ती दर तासाला २ हजार किलोग्रॅम वजनाचीं फळें डबाबंद डब्यांत भरूं शकेल. हंगामामध्यें मुबलक पिकणारीं फळें वर्षभर मिळण्याची सोय कारखान्यामुळें होईल.

---

## कापूस-उत्पादक व विणकरी ह्यांच्या मालकीची भारतांतील पहिली, एकमेव सूत-गिरणी

**( कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सूत-गिरणी लि., इचलकरंजी, जिल्हा : कोल्हापूर (महाराष्ट्र) )**

कोल्हापूर जिल्ह्यामध्यें ८ हजार पॉवर माग व १५ हजारांच्यावर हातमाग असून त्यांपैकी ६ हजारांच्यावर पॉवर माग व १० हजार हातमाग इचलकरंजी शहर आणि त्याच्या परिसरांतील जयसिंगपूर, कुरुंदवाड, वडगांव, रेंदाळ, कोडोली, हुपरी, वगैरे गांवीं आहेत. या धंद्याला अशा प्रकारें विस्तृत स्वरूप प्राप्त होऊनहि या धंद्याचें भवितव्य निश्चित आणि निश्चिंत होण्यामध्यें एक महत्त्वाची अडचण निर्माण होऊन राहिली होती. ती म्हणजे या धंद्यासाठी लागणारा कच्चा माल म्हणजे सूत, त्याची आयात राज्यांतील इतर ठिकाणांहून करावी लागत असे. बाहेरून पुरवठा केला जाणाऱ्या सुताच्या किंमतीमध्यें होणारे फेरबदल त्याचप्रमाणें आवश्यक त्या प्रमाणांत पुरवठा होण्याची शाश्वति नसल्यानें या धंद्यावर संकटाची टांगती तलवार कायमच होती.

### सूतपुरवठ्याची समस्या

कोल्हापूर जिल्हा आणि विशेषतः हातकणंगले व शिरोळ तालुका हे दोन तालुके पूर्वापार कापूस पिकविणारे आहेत. हा भाग देवीराज कापसाच्या लागवडीला सुयोग्य असून त्याच दृष्टीनें या भागांतील श्री पंचगंगा सहकारी साखर कारखान्याच्या देखरेखीखाली देवीराज कापसाची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्याचा कार्यक्रम यापूर्वीच हातीं घेण्यांत आला आहे. नजिकच्या भविष्यकाळांत या भागामध्यें सुमारें १० हजार एकर जमीन देवीराज कापसाच्या लागवडीखाली येईल असा अंदाज आहे. अशा प्रकारें होणाऱ्या कापसाच्या उत्पादनाबद्दल कापूस-उत्पादक शेतकऱ्याला वाजवी किंमत मिळवून देणें हीसुद्धां एक आर्थिक व सामाजिक समस्या होती. विणकरांना भासणारी सूत-पुरवठ्याची समस्या आणि कापूस उत्पादकांना भासणारी वाजवी किंमत मिळण्याची समस्या, यांचा समन्वय साधण्याची तीव्र आवश्यकता निर्माण होऊन राहिली होती.

### उपाय : सहकारी सूत-गिरणी

या समस्येंतून मार्ग काढण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्याचे मान्यवर नेते दे. भ. आमदार श्री. रत्नाप्पा कुंभार यांच्या अध्यक्षतेखालीं दि. ५–९–१९६३ इसवी रोजीं पहिली सभा होऊन ४० हजार स्पिंडल्सची एक सहकारी सूत-गिरणी काढण्याचा निर्णय घेण्यांत आला. सरकारच्या कृषि-औद्योगिक धोरणास अनुसरून संकल्पित सूत-गिरणी विणकरी आणि शेतकरी यांच्या संयुक्त मालकीची असावी, असेंहि ठरविण्यांत आलें.

दिनांक २६ डिसेंबर, १९६३ रोजीं गुरुपुष्य नक्षत्राच्या शुभ-दिवशीं या योजनेसाठी इंडस्ट्रियल लायसेन्स मिळविण्याकरितां राज्य सरकारमार्फत प्रपोजल पाठविण्यांत आलें. राज्य सरकारच्या सहकार व उद्योग खात्यांतील लहानथोर सर्व अधिकाऱ्यांनीं सूत-गिरणीचें काम अत्यंत आस्थापूर्वक हाताळून कोणत्याहि प्रकारचा विलंब न करतां राज्य सरकारच्या शिफारशीसह भारत सरकार-कडे रवाना केलें.

मध्यंतरीच्या काळांत शेअर भांडवल गोळा करण्याचें काम चालूच होतें. संस्थेचें सहकारी कायद्याखाली रजिस्ट्रेशन करण्या-साठी दि. २७ जानेवारी, १९६४ रोजीं रजिस्ट्रेशन प्रपोजल समारंभपूर्वक महाराष्ट्र राज्याचे मुख्य मंत्री माननीय नामदार श्री. वसंतरावजी नाईक यांच्या शुभहस्तें सुपूर्त करण्यांत आलें.

### सरकारी परवाना आणि संस्थेची नोंदणी

दिनांक ५ मे, १९६४ रोजीं भारत सरकारकडून २५ हजार स्पिंडल्स कपॅसिटीचा परवाना मिळाला आणि दि. १७ ऑगस्ट, १९६४ रोजीं संस्था सहकारी कायद्याखाली रजिस्टर झाली.

४० हजार स्पिंडल्सची मूळ योजना सर्वथैव योग्य व परिपूर्ण असूनहि केंद्र सरकारनें २५ हजार स्पिंडल्स कपॅसिटी स्टँडर्ड मानून लायसेन्सिस देण्याचें सर्वसामान्य धोरण ठरविलें असल्यानें २५ हजार स्पिंडल्सचे लायसेन्स स्वीकारून कामास सुरुवात करावी व हळूहळू एक लाख स्पिंडल्सचें अंतिम उद्दिष्ट गांठावें, असें ठरलें. अंतिम उद्दिष्टास अनुसरूनच व्यवस्था करून घेण्याचें धोरण ठेवण्यांत आलें आहे. त्याचाच पहिला भाग म्हणून या सूत-गिरणीसाठी सुमारें १३० एकर जागा घेण्यांत आली आहे.

या योजनेचा भांडवली खर्च सुमारें १ कोटी, ४० लाख रुपयांपर्यंत होणार असून या गिरणीमध्यें ६०–८० काउंट्स सुपरफाइन सूत व ४४ काउंट्स मिडिअम प्रतीचें सूत तयार होईल. दररोज तीन पाळ्या याप्रमाणें वर्षांतून ३०० दिवस काम चालेल आणि सुमारें ५०० चे वर लोकांना रोजगार मिळेल.

### सहकारी साखरकारखान्यांनीं वाट दाखविली

शेतीमधून निर्माण होणाऱ्या मालावर प्रक्रिया करून त्याचें पक्क्या मालांत रूपांतर करण्याचीं साधनें उत्पादकांना उपलब्ध करून देण्याचें धोरण आपल्या भारत सरकारनें अंगीकारलें आहे. त्यानुसार ऊसउत्पादकांच्या मालकीचे सहकारी साखर कारखाने आज राज्याच्या विविध भागांत निर्माण झालेले आपण पाहात आहोंत आणि त्यांचबरोबर अशा सहकारी साखर कारखान्यां-मुळें ऊसकरी शेतकऱ्यांच्या जीवनांत जी आमूलाग्र क्रांति घडून आली आहे तिची अनुभूतीहि कित्येकांनीं अनुभवली आहे.

याच प्रयत्नाचें पुढील पाऊल म्हणून चवथ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत सहकारी तत्त्वावर सुमारें तीस सूत-गिरण्या प्रस्थापित करण्याचें महाराष्ट्र राज्य सरकारनें ठरविलें आहे. यापैकी, २१ गिरण्या केवळ कापूसउत्पादकांच्या मालकीच्या असतील असें ठरविण्यांत आलें आहे. कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सूत गिरणी लि., इचलकरंजी हीं मात्र कापूस उत्पादक शेतकरी व विणकरी या दोन्ही वर्गांच्या संयुक्त माल-कीची भारतांतील पहिली व एकमेव सूत-गिरणी आहे, हें या ठिकाणीं मुद्दाम नमूद करण्यासारखें आहे. या गिरणीच्या द्वारें ज्याप्रमाणें कापूसउत्पादक शेतकरी व विणकरी यांचें जीवन सुखी होणार आहे, त्याचप्रमाणें या व्यवसायाचा तिसरा आधार जो कामगार वर्ग त्यांच्यासाठीहि एक आदर्श हौसिंग कॉलनी सुरवातीपासूनच निर्माण करण्याचा चालकांचा विचार आहे.

### विरोधी हितसंबंधांचा मेळ

कापूसउत्पादक शेतकरी आणि सुताचे ग्राहक म्हणजे विण-करी या दोघांचे हितसंबंध परस्परविरोधी असून त्यांचें सह-जीवन कितपत यशस्वी होईल अशी शंका सहकारी क्षेत्रांत प्रदर्शित केली जात होती. तथापि, कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सूत-गिरणीच्या प्रवर्तकांनीं या दोन्हीं घटकांचा हितसंबंध योग्य रीतीनें सांभाळणेची सरकारची खात्री करून दिली आणि हा सहजीवनाचा अभिनव प्रयोग यशस्वी करून दाखविण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. राज्यसरकारनेंहि या प्रयोगाचें स्वागत केलें असून त्यासाठी एक खास बाब म्हणून या गिरणीच्या मिश्र स्वरूपाला मान्यता दिली आहे.

### विणकऱ्याचें दुष्टचक्र तोडण्याची योजना

शेतकरी आणि विणकरी यांची सध्यांच्या अवस्थेंत होणारी आर्थिक पिळवणूक दूर व्हावी या मूलभूत उद्देशानें ही सूत गिरणी स्थापन होत आहे. अर्थात् विणकऱ्याला योग्य भावांत सूत पुरविलें म्हणजे तेवढ्यानेंच त्याची आर्थिक पिळवणूक थांबेल असें मात्र संचालक मंडळाला वाटत नाहीं. सूत मिळण्यापासून आणि त्या सुतापासून बनवलेलें कापड विकून प्रत्यक्ष कापड वापरणाऱ्याच्या हातीं जाईपर्यंत प्रत्येक व्यवस्थेंत कांहीं ना कांहीं प्रमाणांत आर्थिक पिळवणूक चाललेलीच असते. किंबहुना तें एक मोठें दुष्टचक्रच आहे. योग्य भावांत सूत मिळाल्यानें विणकऱ्याला ग्रासणारें हें दुष्टचक्र तोडलें जाईल. पण पूर्णांशानें त्यांची मुक्तता होणार नाहीं म्हणून या कार्याची व्याप्ति वाढवून ती ज्या ज्या अवस्थेंत आर्थिक पिळवणूक होणें संभाव्य असेल त्या त्या अवस्थेपर्यंत नेण्याची संस्थेची कल्पना आहे. याच उद्देशानें, सूत निर्माण झाल्यानंतर त्याची विमे तयार करून देणें, सूत रंगवून देणें, वगैरे प्रक्रियाहि या सूत गिरणीमार्फत चालू करण्याचा संस्था चालकांचा विचार आहे. इतकेंच नव्हे तर तयार झालेलें कापडहि विणण्याची यंत्रणा निर्माण करण्याचा संस्थेचा मानस आहे.

### कापूस उत्पादकांनाहि मदत

कापूस उत्पादकांनाहि कापसाचें उत्पादन अधिकाधिक वाढविण्यासाठी आवश्यक ती सर्व आर्थिक व तांत्रिक मदत दिली जाईल. बागायती कापसाचें सध्यांचें क्षेत्र वाढविलें जाईल. सध्यां आपल्या देशांतील सूत गिरण्यांना लागणारा कापूस पुरेसा मिळत नाहीं व त्यामुळें कांहीं प्रमाणांत परदेशांतूनहि कापूस आणावा लागतो. नजीकच्या भविष्यकाळांत किमानपक्षीं या सूत गिरणीला स्वतःला लागणारा सर्व कापूस या भागांतूनच मिळविण्याचा संस्था चालकांनीं संकल्प केला आहे.

### प्रत्येकाला योग्य मूल्य

अशा तऱ्हेनें कापूस उत्पादन करण्यापासून तो तहत त्या कापसापासून तयार झालेलें कापड प्रत्यक्ष वापरणाऱ्यांच्या हातांत पडेपर्यंत कोणत्याहि अवस्थेंत कोणाचीहि आर्थिक पिळवणूक न होतां प्रत्येकाला त्याच्या त्याच्या श्रमाचें व पैशाचें योग्य मूल्य मिळवून देण्याची ग्वाही देणारी ही सूत गिरणीची योजना आहे. सहजिकच कलहाचें मूळ कारणच दूर झाल्यामुळें कोणाचेहि हितसंबंध दुखावले जाणार नाहींत व ही सूत गिरणी खऱ्याखुऱ्या अर्थानें सहकारी समाजरचनेचा एक आदर्श ठरणार आहे.

### प्रवर्तकांना सभासदांचा प्रतिसाद

दे. भ. रत्नापा कुंभार आणि त्यांचे सहकारी यांनीं हा क्रांतिकारक प्रयोग सुरू केला आणि सरकारनें त्यांचा मार्ग मोकळा करून दिला. ५ सप्टेंबर, १९६३ रोजीं पहिल्या सभेंत जेव्हां ही कल्पना मांडली गेली त्याच वेळीं, त्याच जागीं, पावणेदोन लाख रुपयांचे शेअर्स घेण्याचीं आश्वासनें मिळालीं. अवघ्या चार महिन्यांत, रजिस्ट्रेशन प्रपोजल पाठविते वेळीं, सभासद संख्येचा आंकडा ५१६ वर गेला आणि त्यांनीं शेअर-भांडवल म्हणून पांच लाख रुपये जमा केले. पहिल्या जनरल मीटिंगच्या वेळेपर्यंत आणखी २५५ नवे सभासद झाले आणि शेअर भांडवलहि वाढलें. आज सभासदांची संख्या १,०३४ झाली असून शेअर भांडवल ६ लाख, ५६ हजार रुपये झालें आहे आणि तें एकसारखें वाढत आहे.

### भांडवलाची व्यवस्था

एकूण लागणाऱ्या सुमारें रु. १ कोटी, ४० लाख भांडवलीं खर्चापैकीं २० टक्के म्हणजे २८ लाख रुपये सभासदांनीं शेअर भांडवल म्हणून उभें करणेंच आहे आणि त्यांपैकीं रु. ६ लाख, ५६ हजार आज जमविलेलें आहे. महाराष्ट्र राज्य सरकार तेवढ्याच रकमेचे संस्थेचे शेअर्स घेणार असून त्यापैकीं ६ लाख, २५ हजार रुपये सरकारनें ता. ३१ मार्च १९६५ पूर्वींच दिले आहेत. राहिलेली ८४ लाख रुपयांची रक्कम इंडस्ट्रियल फायनान्स कार्पोरेशन किंवा तत्सम अर्थ पुरविणाऱ्या संस्थेकडून सरकारी गॅरंटीवर दीर्घ मुदतीचें कर्ज म्हणून घ्यावयाची आहे.

### मशिनरीची व्यवस्था

सूत गिरणीला लागणाऱ्या यंत्रसामग्रीपैकी महत्त्वाच्या मशिनरीच्या ऑर्डर्स देण्यांत आल्या असून मशिनरी तयार होऊं लागली आहे. परदेशांतून आयात करावयाची ड्रॉ फ्रेम्स व रोव्हिंग फ्रेम्स वगैरे सुमारें १० लाख रुपये किमतीच्या मशिनरीची ऑर्डर मे. व्हायटिन इंटरनॅशनल या प्रख्यात अमेरिकन कंपनीकडे देण्यात आली असून देशी मशिनरीपैकी रिंग फ्रेम्सची सुमारें ३० लाख रुपये किमतीची ऑर्डर मे. टेक्स्मॅको (टेक्स्टाईल मशिनरी कार्पोरेशन) या सुप्रसिद्ध हिंदुस्थानांतील कंपनीकडे देण्यांत आली आहे. राहिलेल्या मशिनरीच्या ऑर्डर्सहि देण्यांत येत आहेत. पावसाळा संपतांच मशिनरी येण्यास सुरवात होणार असून १९६६ च्या वर्षअखेरपर्यंत सूत निर्मितीला प्रारंभ होईल.

### भूमिपूजन समारंभ

कोल्हापूर जिल्ह्याचें भाग्य उजळविणाऱ्या या अभिनव प्रकल्पासाठी महाराष्ट्राचें मँचेस्टर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इचलकरंजी शहराच्या सीमेलगत इचलकरंजी–जयसिंगपूर मार्गावर यड्राव गांवांतील सुमारें १३० एकर जागा घेण्यांत आली असून ती जागा सर्व दृष्टींनीं सोईची आहे. सहकारी सूत गिरणीचा हा भूमिपूजन समारंभ कोईमतूरसारख्या सूत गिरण्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या शहराचें प्रतिनिधित्व करणारे आणि कापड धंद्याशीं कांहीं काळ जवळचा संबंध असलेले भारत सरकारचे अन्न व कृषिमंत्री नामदार श्री. सी. सुब्रह्मण्यम् यांच्या शुभहस्तें आणि मुंबईच्या राष्ट्रीय मिलमजदूर संघाचें अनेक वर्षें अध्यक्षपद भूषविलेले महाराष्ट्र राज्याचे शेतकी मंत्री नामदार श्री. बाळासाहेब सावंत यांच्या अध्यक्षतेखालीं झाला आहे. या शुभ समारंभासाठी केंद्रीय अन्न खात्याचे उपमंत्री मा. नामदार श्री. आनंदरावजी चव्हाण व महाराष्ट्र राज्याचे शेती खात्याचे उपमंत्री नामदार श्री. यशवंतरावजी मोहिते यांनीं उपस्थित राहून शुभाशिर्वाद दिले.

### सरकार–नियुक्त पहिलें संचालक मंडळ

(१) दे. भ. श्री. रत्नाप्पा कुंभार, बी. ए., एम. एल. ए., एक्स–एम. पी., चेअरमन. (२) श्री. मृ. वि. सुलतानपुरे, बी. ए., एलएल. बी., व्हाइस–चेअरमन. (३) श्री. शंकरराव गणपती डंबाळ, (४) श्री. महादेव ज्ञानोबा लायकर, (५) श्री. बाळगोंडा तुकाराम पाटील, (६) श्री. नारायण लक्ष्मण बढवे, (७) श्री. बापूसाहेब चिंतामणी उपाध्ये, (८) तात्यासाहेब भाऊराव सांवगांवे, (९) श्री. पारीसा भरमाप्पा इंगोळे, (१०) श्री. डी. टी. ऊर्फ बाळासाहेब चिवटे, (११) रघुनाथराव यशवंतराव देसाई, (१२) श्री. नेमचंद रावजी शहा.

**चीनला फ्रान्सकडून मालवाहू मोटारी**—चीननें फ्रान्समधील एका कंपनीकडून १,०३५ अवजड मालवाहू मोटारी विकत घेण्याचा करार केला आहे. ह्या गाड्यांसाठी चीनला ३ कोटी डॉलर्सची किंमत द्यावी लागेल. चीनच्या सरकारी व्यापारी कॉर्पोरेशननें पश्चिम युरोपांतील देशांशीं केलेला हा सवात मोठा सौदा आहे. चीन आपल्या वाहतुकीच्या व्यवस्थेचें आधुनिकीकरण करण्याच्या प्रयत्नांत आहे, असा तर्क ह्यावरून करण्यांत येत आहे.

**रशिआकडून ध्वनिक्षेपक मिळणार**—रशिया भारताला एक हजार किलोवॅट शक्तीचा मध्यम लहरींचा ध्वनिक्षेपक देणार आहे. त्याची किंमत रुपयांत घेण्यासहि रशियानें तयारी दाखविली आहे. ध्वनिक्षेपक उभारण्याच्या प्राथमिक कामाला सुरुवात करण्यासाठी रशिअन तज्ज्ञांचें एक प्रतिनिधिमंडळ लवकरच भारतांत येणार आहे.

**युद्धांतील पडझडीची दुरुस्ती**—दक्षिण व्हिएटनाममधील कम्युनिस्ट गनिमी सैनिकांना उत्तर व्हिएटनाममधून हरतऱ्हेचा पुरवठा होतो. पुरवठा बंद पाडण्यासाठी अमेरिकन व दक्षिण व्हिएटनाम विमानांनीं गेले कांहीं महिने पुरवठ्याच्या मार्गावरील पुलांवर बाँब टाकून ते निकामी करण्याचें सत्र आरंभिलें आहे. परंतु त्याचा व्हावा तितका उपयोग होत नाहीं. कारण गनिमांचें लष्कर कांहीं दिवसांतच पूल कारणापुरते दुरुस्त करून त्यांचा पुन्हा वापर करूं लागतात, असें अमेरिकेच्या संरक्षण खात्यानें जाहीर केलें आहे.

**स्वीडनमध्यें गुप्तरोगांचें प्रमाण अधिक**—स्वीडनच्या मेडिकल बोर्डानें केलेल्या तपासणींत असें दिसून आलें आहे कीं, स्त्री–पुरुषांना होणाऱ्या गुप्तरोगांचें प्रमाण स्वीडनमध्यें त्या देशांतील लोकसंख्येच्या मानानें जगांत सर्वांत अधिक आहे. गेल्या वर्षी असे रोग झालेल्या २३ हजार रोग्यांची नोंद करण्यांत आली. त्यांपैकी दोनतृतीयांश रोगी २० ते २४ वर्षें वयांतील पुरुष होते. एक तृतीयांश रोगी मुली होत्या. त्यांचीं वयें १५ ते १९ ह्यांच्या दरम्यान होतीं.

**ब्रिटिश बँकांची सीलोनला मदत**—सीलोनचें सरकार परदेशीय हुंडणावळीच्या टंचाईच्या संकटांत सांपडलें आहे. ह्या संकटांत मदत करण्याची तयारी सीलोनमधील ५ ब्रिटिश बँकांनीं दाखविली आहे. ह्या बँका सीलोनला ४ कोटी पौंड कर्ज देण्यास तयार आहेत. कर्जाची फेड सिलोनी रुपयाच्या चलनांत करून घेण्यासहि त्या तयार आहेत. कर्जाचा उपयोग करून सीलोन अतिशय जरूरीच्या वस्तु आयात करणार आहे.

**गाड्यांचा आवाज कमी करण्यासाठीं**—रेल्वेगाड्या रुळांवरून धावूं लागल्या कीं रुळांच्या जोडणीमधील फटीवर चाकांचे आवाज होतात. हे कमी करण्यासाठी रूळ एकमेकांशीं धातुसाधित करण्याचें काम रेल्वे खातें करीत आहे. अशा प्रकारें जोडल्या गेलेल्या रेल्वेमार्गाची लांबी आतां १० हजार किलोमीटर झाली आहे. पांच रूळ अशा रीतीनें जोडण्यांत आले कीं २१० फूट लांबीचा रेल्वे मार्ग सलग होतो.

**सोयाबीनच्या तेलाची आयात**—अमेरिकेच्या पब्लिक लॉ ४८० प्रमाणें गेल्या वर्षी ७५ हजार टन सोयाबीनचें तेल आयात करण्याचा करार करण्यांत आला होता. त्यांपैकी १,२४४ टन तेल घेऊन एक अमेरिकन बोट कलकत्ता बंदराला लागली आहे. ह्या तेलांपैकी १६ हजार टन तेल भारताच्या पूर्व विभागासाठी असून त्याचा उपयोग वनस्पति तूप तयार करण्यासाठी करावयाचा आहे.


## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

" चिपळूणे निकेतन ", १४३/१४६ भवानी पेठ

**सातारा–शहर**

*दि. १८-७-६६ पासून ठेवींवरील व्याजाचे दरांत खालीलप्रमाणें वाढ झालेली आहे.*

### मुदतीच्या ठेवी

| मुदत | | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | द. सा. द. शें. | ६=२५ |
| २ वर्षें | ,, | ६=५० |
| ३ वर्षें | ,, | ६=७५ |
| ५ वर्षें | ,, | ७=२५ |
| ७ वर्षें | ,, | ७=५० |
| ९ वर्षें व जास्त | ,, | ७=६२ |

**सेव्हिंग्ज बँक खातें :—दि. १–२–६५ पासून ४ टक्के**

*तसेंच अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक दरानें स्वीकारल्या जातील.*

याबाबत आमच्या कोणत्याहि शाखेंत अधिक माहिती मिळूं शकेल.

महाराष्ट्रांतील व्यापारी व व्यवस्थापकीय शिक्षणाची आद्य संस्था

## डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स

संस्थापक : प्रा. ग. कृ. भोपटकर, एफ्. सी. आय.

स्थापना : १९१८] [टेलिफोन नं. ५४१६०

**७१७ बुधवार पेठ, जिजामाता बागेसमोर, पुणें २.**

जी. सी. डी., डी. कॉम., एल. सी. सी., जी. डी. सी. ॲन्ड ए., सी. ए. आय. आय. बी., ए. आय. सी. डब्ल्यू. ए., (कॉस्टिंग), भारत सरकारच्या कंपनीच्या सेक्रेटरी परीक्षा, लायसेन्शिएट इन्शुअरन्स परीक्षा, शॉर्टहॅंड, इंग्रजी–मराठी टाईपरायटिंग, पुणें विद्यापीठाच्या एक्स्टर्नल प्री-डिग्री कॉमर्स व बी. कॉम. डिग्री कोर्स आणि इन्स्टिटयूटचा बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स.

**२४ जून, १९६५ पासून वर्ग सुरू होतील.**

**—खास वैशिष्ट्यें—**


★ सकाळ-संध्याकाळ-दुपारचे वर्ग.
★ इंग्रजी-मराठींतून अध्यापनाची सोय.
★ एस्. एस्. सी., अंडर-ग्रॅज्युएट्स् व ग्रॅज्युएट्स् अशा सर्वांना योग्य असे अभ्यासक्रम.
★ बँकेंत नोकरी करणाऱ्या वा नोकरी करूं इच्छिणाऱ्यासाठी ३ महिन्यांचा बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स.
★ बी. कॉम्. एक्स्टर्नल डिग्रीच्या अभ्यासाची संपूर्ण सोय.

**व्याजाचे आकर्षक दर**

सेव्हिंग खातें – ४%

मुदतीच्या ठेवी

१ वर्ष — ६ १/८ %
२ वर्षे — ६ ३/८ %
३ वर्षे — ६ ५/८ %
५ वर्षे — ७ १/८ %
७ वर्षे — ७ २/८ %
९ वर्षे — ७ ५/८ %




तुमची जिव्हाळ्याची बँक

**बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

रजि. ऑफिस : ११७७, बुधवार पेठ, पुणे शहर.

दातांच्या स्वच्छतेसाठी

**★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★**

**सरदारगृह**

**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**


मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमचीं वैशिष्ट्यें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :–३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

महाराष्ट्र सरकारनें
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग




तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.

**– न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –**

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें